**फौजदारी कि.अर्ज क्र.१६५/२०२३**
**श्री. शानूर सनदी वि. सलिम सनदी**
**निशाणी १ सोबत**

**फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २०० प्रमाणे फिर्यादीचा साक्षीतपास**

| | |
|---|---|
| नाव | : श्री. शानूर इमाम सनदी |
| वय | : ३८ वर्षे |
| व्यवसाय | : गॅरेज |
| राहणार | : एमआयडीसी, मिरज. |

माझे घरी मी, माझी पत्नी व तीन मुले रहातो. माझे आईवडील कुपवाड येथे वेगळे राहतात. दि.१८/११/२०२३ रोजी माझ्यामध्ये व माझ्या पत्नीमध्ये वाद झाला होता. त्यानंतर माझी पत्नी ही तिचे माहेरी गेली होती. त्यानंतर माझा मेहुणा हा त्याचे पाच मित्रांसह माझ्या घरी आले. ते रात्री १२.०० वा.चे सुमारास माझ्या घरी आले. त्यापैकी सलीम सनदी याने मला माझे डोके धरुन भिंतीवर आपटले. तसेच मला शहनशहा याने काठीने मारले व इतरांनी मला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यांचेसोबत राजू सुभेदार हा देखील होता. इतरांची मला नावे माहिती नाहीत.

त्यानंतर माझा मेहुणा माझ्या पत्नीला घेऊन गेला. त्यानंतर दुस–या दिवशी मी तक्रार देण्याकरिता पोलीस स्टेशनला गेलो. त्यावेळी पोलिसांनी मला सरकारी दवाखान्यामध्ये पाठविले होते. त्यानंतर दवाखान्यातून सायंकाळी परत आल्यानंतर त्यांनी माझी तक्रार नोंदवून घेतली परंतु त्यांनी सदरहू तक्रार माझे सांगणेप्रमाणे नोंदवून घेतली नाही. माझ्या मेहुण्याने यापूर्वी देखील मला मारहाण केली होती. तेव्हा देखील पोलिसांनी माझी तक्रार घेतली नव्हती. परंतु, पोलिसांनी

त्यांचे विरुध्द कोणतीही कारवाई न केल्यामुळे मी प्रस्तुतची फिर्याद दाखल केली आहे. तरी आरोपींना त्याबाबत कडक शासन व्हावे.

---Sd/----

फिर्यादीची सही

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

---Sd/----

मिरज.

**(निरंजन बा. चव्हाण)**

दिनांक : २३/०१/२०२४

४ थे न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग

मिरज

*****